आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१३ जून २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- पेमा खांडू यांनी आज सलग तिसऱ्यांदा घेतली अरुणाचल प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी ७ देशांच्या परिषदेसाठी आज इटलीला रवाना होणार

**<><><><><>**

नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. ग्रेस मार्कशिवाय मिळालेले गुण या विद्यार्थ्यांना कळवले जातील आणि त्यांना २३ जून रोजी पुन्हा परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करुन देणार असल्याची माहिती केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयात दिली. ज्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायची नसेल त्यांचे ग्रेस मार्कांशिवाय मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील. २३ जून रोजी होणाऱ्या परीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाईल, असंही सरकारनं आज सांगितलं. ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणांची पडताळणी करण्यासाठी सरकारनं एका समिती स्थापन केली आहे. त्या समितीच्या शिफारसींनुसार सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

५ मे रोजी झालेल्या परीक्षेत गैरप्रकार आणि पेपर फुटी झाल्याचा आरोप करत काही विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर

आज सुनावणी झाली. कौन्सिलिंगला कुठलीही स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला.

दरम्यान नीट परीक्षेच्या दरम्यान कुठलाही गैरप्रकार झाला नसल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आज सांगितलं.

**<><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते पेमा खांडू यांनी आज सलग तिसऱ्यांदा अरुणाचल प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. खांडू यांच्यासह इतर ११ कॅबिनेट मंत्र्यांनीही इटानगर इथं डीके कन्व्हेन्शन हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, आरोग्य मंत्री जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि अरुणाचल पूर्व लोकसभा मतदारसंघाचे खासदार तापीर गाओ उपस्थित होते.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं सुनेत्रा पवार यांना राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी दिली आहे. प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभा सदस्यत्वाची मुदत पूर्ण होण्याआधीच राजीनामा दिल्यामुळं ही जागा रिकामी झाली आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी त्या विधान भवनात दाखल झाल्या आहेत. या उमेदवारीसाठी माझ्यासह तेरा जण इच्छुक होते, पण पक्षात सर्वांच्या सहमतीने सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाला, अशी माहिती पक्षाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. या निर्णयानंतर पक्षात कुणीही नाराज नसल्याचं भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

मध्य प्रदेशमध्ये मुख्यमंत्री डॉ मोहन यादव यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारनं आपल्या कार्यकाळाचे १८० दिवस पूर्ण केले. त्यानिमित्तानं भोपाळ इथं

राजा भोज विमान तळावर मुख्यमंत्री यादव यांनी प्रधानमंत्री श्री पर्यटन हवाई सेवेचं उद्घाटन केलं. या हवाई सेवेअंतर्गत भोपाळ, इंदूर, जबलपूर, रीवा, उज्जैन, ग्वाल्हेर, सिंगरौली आणि खजुराहो ही आठ शहरं एकमेकांना जोडली जाणार आहेत.

**<><><><><>**

संततधार पावसामुळे मंगन आणि उत्तर सिक्कीममधील विविध ठिकाणी भूस्खलन झालं आहे. यामुळे तिघांचा मृत्यू झाला आहे. तसंच काही घरांची पडझड झाली असून अनेक कुटुंबे विस्थापित झाली आहेत. मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनी जिल्हा प्रशासन, पोलिस विभाग आणि संबंधित विभागांशी संवाद साधून परीस्थितीचा आढावा घेतला. पीडित कुटुंबांना मूलभूत गरजांच्या तरतूदीसह तात्पुरती व्यवस्था आणि इतर सर्व मदत देण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इटलीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते अपुलिया इथं उद्या होणाऱ्या जी सात देशांच्या शिखर परिषदेत भाग घेणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विनय क्वात्रा यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. जी सात परिषदेत भारताला संपर्क देश म्हणून आमंत्रित करण्यात आलं असून ,प्रधानमंत्रीपदाचा तिसऱ्यांदा पदभार स्वीकारल्या नंतर मोदी यांचा हा पाहिलाच परदेश दौरा आहे. जी सात परिषदेत भारताला आमंत्रित करण्याची ही ११ वी वेळ असून, यामध्ये प्रधानमंत्री मोदी उद्या पाचव्यांदा सहभागी होत आहेत. ते उद्या संपर्क देशांसाठीच्या सत्रात सहभागी होतील. या परिषदेत जगातील प्रमुख राष्ट्रांच्या प्रमुखांशी भारत आणि इतर विकसनशील देशांच्या महत्वपूर्ण प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्याची संधी मिळणार असल्याच विनय क्वात्रा यांनी सांगितल. या शिखर परिषदेच्या निमित्ताने जी सात राष्ट्रांच्या नेत्यांशी

प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करणार असून, इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांचीही ते भेट घेणार आहेत.

<><><><><>

१०व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज एक्स या समाज माध्यमावर ताडासनाचा व्हिडिओ शेअर केला आहे. यात ताडासनाच्या फायद्यांचं वर्णन केलं आहे. ताडासन शरीरासाठी खूप चांगलं असून शरीराला अधिक सामर्थ्य देतं असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

कुवेतच्या मानगाफ परिसरातल्या इमारतीला काल लागलेल्या आगीत ४९ कामगारांचा मृत्यू झाला आहे. कुवेतच्या सरकारी वकिलांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, कुवेतचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्लाह अल याह्या आणि आरोग्य मंत्री अहमद अल अवधी यांनी जखमी कामगारांची काल भेट घेतली. सरकार जखमींना सर्वोतोपरी मदत करेल, अशी ग्वाही त्यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. तर केरळी वंशांच्या नागरिकांच्या मदतीसाठी एक संपर्क क्रमांक जारी केला आहे. कुठलीही मदत हवी असल्यास १८ ०० ४२ ५३ ९३९ या क्रमांकावर संपर्क करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><><>

भुस्खलनामुळे मोठ्या संकटाचा सामना करत असलेल्या पापुआ देशातल्या न्यू गिनीच्या एल्गा प्रांतात भारतानं मानवतावादी दृष्टीकोन ठेवत विविधोपयोगी १९ टन मदत पाठवली आहे. त्यात तात्पुरता निवारा, पाण्याच्या टाक्या, स्वच्छता किट, खाण्यासाठी तयार जेवण आणि डेंग्यूसह ६ टन आपत्कालीन वापरातील औषधे,

वैद्यकीय उपकरणांसह १३ टन आपत्ती निवारण साहित्याचा समावेश आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमांवर ही माहिती दिली.

**<><><><><>**

दोन दिवसांपूर्वी केलेल्या हवाई हल्ल्यात दक्षिण लेबनॉनमधील हिजबुल्लाह कमांडर सामी तालेब अब्दुल्ला ठार झाल्याची पुष्टी इस्त्रायली सैन्यानं केली आहे. हल्ल्यादरम्यान इतर तीन लोक ठार झाले आणि १० जण जखमी झाल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं. दरम्यान इस्त्राईलवरही हल्ला केल्याचं हिजबुल्लानं जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकन फेडरल रिझर्व्ह ने व्याजदर जैसे-थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळं सलग सातव्यांदा व्याजदर सव्वा ५ ते साडे ५ टक्क्यांच्या दरम्यान राहतील. त्याचवेळी वर्षअखेरपर्यंत एखाद्यावेळी व्याजदर कपात होऊ शकते, असे संकेतही दिले आहेत. दोन दिवसीय बैठकीनंतर काल रात्री फेडरल रिझर्व्हनं हा निर्णय जाहीर केला. महागाईचा दर जास्त असल्यानं व्याजदरात कपात केली नसल्याचं फेडरलनं सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिकेत सुरू असलेल्या पुरुषांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात भारतानं अमेरिकेचा ७ गडी राखून पराभव केला. न्यूयॉर्कमधल्या नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना, अमेरिकेनं ११० धावा केल्या. भारताच्या अर्शदीप सिंगने उत्तम गोलंदाजी करत चार बळी घेतले. अमेरिकेच्या सौरभ नेत्रावळकरने भेदक गोलंदाजी करत सुरवातीलाच विराट आणि रोहितला बाद केलं. नंतर सुर्यकुमार यादव आणि शिवम दुबेच्या उत्तम फलंदाजीमुळे भारतानं हे आव्हान पार केलं.

दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडीजनं न्युझीलंडचा १३ धावांनी पराभव केला. या बरोबरच भारत आणि वेस्ट इंडीजने सुपर ८ पात्रताही निश्चित केली आहे.

**<><><><><>**

जर्मनीतल्या स्टुटगार्ड खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या युकी भांब्री आणि त्याचा फ्रान्स जोडीदार अल्बानो ऑलिवेट्टी यांनी काल पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. भांब्री आणि ऑलिवेट्टी यांनी फ्रान्सच्या थेओ ॲरिबेज आणि सॅडिओ डुम्बिआ यांचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमधे पराभव केला. भांब्री आणि ऑलिवेट्टी यांचा सामना आता बेंजामिन हसन आणि डॅनियल मसूर आणि ज्युलियन कॅश आणि रॉबर्ट गॅलोवे यांच्यातल्या विजेत्याशी होईल.

**<><><><><>**

इटली इथं सुरु असलेल्या पेरुगिया चॅलेंजर टेनिस स्पर्धेत भारताच्या सुमित नागलनं काल पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उप उपांत्यपूर्व फेरीत त्यानं ॲलेसेंड्रो जियानेसीचा ०-६, ७-५, ७-६ असा पराभव केला. उद्या उपांत्यपूर्व फेरीत सुमित नागलचा सामना पोलंडच्या मॅक्स कास्निकोव्स्कीशी होईल.

**<><><><><>**

**आयएमएफ श्रीलंका/पूल/अदिती**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं श्रीलंकेसाठी विस्तारित निधी सुविधेचा दुसरा आढावा मंजूर केला आहे. ही मान्यता आर्थिक सुधारणांना पुढे नेण्यासाठी श्रीलंका सरकारला मदत करेल असं श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री अली साबरी यांनी एक्स या समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**//<><><><><>//**